## १) विकास सोसायटी मार्फत कर्जपुरवठा :-

## ४) विकास सोसायट्यामार्फत सभासदांच्या पाल्यांना द्यावयाचे शैक्षणिक कर्जविषयक धोरण :-

**कर्जासाठी पात्रता :-**

**१) विकास/सर्व सेवा सोसायटी पात्रता :-**

१) प्राथमिक पुरवठा सेवा सहकारी सोसायटीचा ऑडीट वर्ग "अ", "ब" किंवा "क" असणे आवश्यक आहे.

२) सोसायटी व बँक पातळीवर एकत्रित वसुली ७० % व जिल्ह्याच्या पूर्व भागातील डी.पी.ए.पी. एरियामधील प्राथमिक पतपुरवठा सेवा सहकारी सोसायटीची, सोसायटी व बँक पातळीवरील एकत्रित वसुली ५० % व त्याच कारणासाठीची वसुली १०० % असली पाहिजे.

३) विकास सोसायटी काही कारणास्तव कर्ज देण्यास पात्र नसेल मात्र वैयक्तिक शेतकरी सभासद पात्र ठरत असलेस अशा कर्ज मागणी प्रकरणाचा अभ्यास करुन संस्था संचालकांची रु.१००/- चे स्टॅम्पवर कर्ज वसुलीची हमी घेवून कर्ज मंजुरीचा विचार केला जाईल.

**२) कर्ज मागणी सभासद पात्रता :-**

१) अर्जदार/सहकर्जदार व जामिनदार हे विकास सोसायटीचे सभासद व अर्जदाराची किमान क्षेत्र धारणा ८० आर असणे आवश्यक असून, अर्जदार थकबाकीदार नसला पाहिजे.

२) शैक्षणिक कर्ज देशांतर्गत व परदेशातील उच्च शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या व प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी व अनुषंगिक खर्चासाठी मिळू शकेल.

३) अर्जदार यांनी सदर कारणासाठी अन्य वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास ते पुन्हा सदरचे कर्ज घेण्यास पात्र राहणार नाहीत.

**पात्र कोर्सेस :-**

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नावाजलेल्या विद्यापिठांतील नाविन्यपूर्ण व्यावसाईक, तांत्रिक, पोस्ट ग्रॅज्युएट (पदव्युत्तर), एरॉनॉटीकल, मरीन, स्पेस इंजिनिअरिंग,रिझर्व्ह ॲन्ड डेव्हलपमेंट अथवा तत्सम पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सेस स्पेशल टेक्नॉलॉजी/वैद्यकीय/वैज्ञानिक उदा. ॲग्रो बिझनेस अँड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, सिंम्बायोसीस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अशा नामांकीत विद्यापिठाकडील पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सेस, प्रोग्रॅम इन मेडिकल सायन्सेस, पोस्ट ग्रॅज्युएशन प्रोग्रॅम इन कन्स्ट्रक्शन, विदेशातील एम.एस.कोर्सेस ऑफ अ ेनी फॅकल्टी असे उच्च दर्जाचे कोर्सेसच विचारांत घेतले जातील.कर्ज **मर्यादा :-**

**देशांतर्गत** शिक्षणासाठी कमाल रु.१५.०० लाख मात्र कर्ज मर्यादा राहील.

१) परदेशातील उच्च शिक्षणासाठी कमाल रु.३५.०० लाख मात्र कर्ज मर्यादा राहील.

**व्याजदर :-** सोसायटीस ९ % व सभासदास १० % व्याजदर राहील.